आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२८

# विदर्भातील अमरावती विभागामध्ये आदिवासी व दुर्गम भागातील शाळांमध्ये अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यामध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका.

# The Role of School Leadership in Improving the Educational Environment for the Achievement of Learning Outcomes in Tribal and Remote Schools in the Amravati Division of Vidarbha.





**प्रस्तावना -**

विदर्भ हा महाराष्ट्रातील एक भौगोलिक प्रांत असून एकंदरीत कोकण ,पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भ असे पाच भौगोलिक विभाग पडतात महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ मोठे असून लोकसंख्या ही अकरा कोटी पेक्षा जास्त आहे शिवाय महाराष्ट्रातील भौगोलिक प्रांतानुसार वेगवेगळया संस्कृती व परिस्थिती आपणास दिसून येते. त्यामुळे एका ठिकाणी असलेली परिस्थिती ही शिक्षणासाठी दुसऱ्या ठिकाणी लागू होईल असे निश्चितपणे सांगता येत नाही, कारण महाराष्ट्रात मराठी बोलली जात असली तरी पण त्या मराठीची अनेक रूपे आपणास दिसून येतील. विशेषतः विदर्भातील उत्तरेकडील भाग हा सातपुडा पर्वताचा असून हा दुर्गम भाग आहे या भागांमध्ये मुख्यत्वे आदिवासी समाज वसलेला आहे विदर्भातील पूर्व विदर्भ व पश्चिम विदर्भ असे दोन विभाग आपणास दिसून येतात. त्यामध्ये पश्चिम विदर्भामध्ये अमरावती विभागाचा समावेश होतो तर पूर्व विदर्भामध्ये नागपूर विभागाचा समावेश होतो. तुलनेत नागपूर विभागात जंगल हे घनदाट असून त्यातील चंद्रपूर गोंदिया भंडारा अमरावती जिल्ह्यातील उत्तरेकडील भाग आणि वर्धा जिल्ह्यातील पूर्वेकडील भाग हा अभयारण्यामध्ये येतो या डोंगरी भागांमध्ये रस्ते तसेच इतर नागरी सुविधांचा अभाव आपणास दिसून येतो. या डोंगरी तसेच दुर्गम भागातील आदिवासी समाजांची भाषा ही वेगळी आहे आणि त्यामुळे त्यांच्या समवेत असलेली शिक्षण प्रक्रिया ही त्यांना अवगत करण्यासाठी खूपच कठीण जाते. त्यामुळे आजही मेळघाट गोंदिया भंडारा चंद्रपूर मधील काही भागात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. शिवाय हे प्रदेश डोंगरी असल्याने या भागामध्ये इतर साधनांचाही अभाव आढळून येतो पालक अशिक्षित आहेत आणि शिक्षणाविषयी त्यांना अनास्था आपणास दिसून येते. अशा भागांमध्ये शालेय नेतृत्वाचा खरा कस लागलेला आपणास दिसून येतो. ज्या ठिकाणी शालेय नेतृत्व हे सकारात्मक आणि प्रगतीशील आहे अशा ठिकाणी आपणास शाळांची स्थिती चांगली दिसून येते. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही गुणवत्ता पूर्ण दिसून येते, मात्र बहुतांश ठिकाणी आपणास ही परिस्थिती विपरीत सुद्धा दिसून येते त्यामुळे शाळा प्रमुख म्हणजेच शालेय नेतृत्व यांचा दृष्टिकोन आणि कार्यनिती कोणत्याही शाळेच्या विकासामध्ये अतिशय महत्त्वाची भूमिका बजावते हे अधोरेखित होते.

**विदर्भातील अमरावती व नागपूर विभागातील आदिवासी लोकसंख्या.**

Amravati Division

| Sr. No | District | Population | | Percentage of Tribal Population to the Total Population |
|---|---|---|---|---|
| | | Total | Tribal | |
| 1 | Buldana | 2586 | 125 | 4.83 |
| 2 | Akola | 1814 | 100 | 5.51 |
| 3 | Washim | 1197 | 81 | 6.77 |
| 4 | Amravati | 2889 | 404 | 13.98 |
| 5 | Yavatmal | 2772 | 514 | 18.54 |
| Total | | 11258 | 1224 | 10.87 |

Nagpur Division

| Sr. No | District | Population | | Percentage of Tribal Population to the Total Population |
|---|---|---|---|---|
| | | Total | Tribal | |
| 1 | Wardha | 1301 | 150 | 11.53 |
| 2 | Nagpur | 4654 | 438 | 9.41 |
| 3 | Bhandara | 1200 | 89 | 7.42 |
| 4 | Gondia | 1323 | 214 | 16.18 |
| 5 | Chandrapur | 2204 | 389 | 17.65 |
| 6 | Gadchiroli | 1073 | 415 | 38.68 |
| Total | | 11755 | 1695 | 14.42 |

Population in Thousand)

परिवर्तन झालेल्या शाळेची कल्पना (Transformation of school) प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने कार्य करण्याची प्रेरणा, कार्यरत शाळा प्रमुख आणि व्यवस्थेतील मुलांच्या अध्ययनातील गुणवत्ता शाळाप्रमुख आणि शालेय व्यवस्थेतील यंत्रणा यांच्या प्रयत्नांशी संबंधित आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शिकण्यात पूरक सहकार्यशील अध्ययन संस्कृती निर्माण करण्यासाठी शाळा प्रमुखाचे ज्ञान कौशल्य आणि दृष्टिकोन विकसित असणे आवश्यक आहे.केंद्र, गट आणि जिल्ह्यातील शाळांची शैक्षणिक गुणवत्ता विकसनासाठी शिक्षण व्यवस्थेतील यंत्रणेमध्ये (CRC/BRC/BEO/ ABEI/DEO/DPO) यांच्या अंगी सर्वसमावेशक दृष्टी विकसित होणे गरजेचे आहे.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्ट्ये -**

1) आदिवासी व दुर्गम भागातील शाळांमध्ये अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यामध्ये शैक्षणिक नेतृत्वाची भूमिका समजून घेणे .
2) आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यामध्ये यशस्वी शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे
3) आदिवासी व दुर्गम क्षेत्रात अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यामध्ये यशस्वी शालेय नेतृत्वाबाबत दृष्टिकोन विकसित करणे.

**अध्ययन निष्पत्ती म्हणजे काय :-** शिक्षण ही निरंतर प्रक्रिया आहे. मुलांमध्ये क्षमता विकसित करण्यासाठी वापरलेल्या अध्ययन/अध्यापन प्रक्रियांचा परिणाम अध्ययन निष्पत्तींवर होतो. सर्व विषयाचे अध्ययन हे बोलण्याचे, वापरण्याचे, शोध घेण्याचे महत्वाचे साधन आहे, हे विद्यार्थ्यांना जाणवले पाहिजे. त्याच बरोबर

प्रत्येक विषयाची बांधणीही त्यांना समजली पाहिजे. म्हणून या मोड्यूल मध्ये इयत्ता १ ते ५ साठीच्या अध्ययन निष्पत्ती देण्याचा प्रयत्न केला आहे. अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यासाठी शिक्षक वापरू शकतील अशा काही अध्यापन प्रक्रियाही सुचविल्या आहेत. त्या परिपूर्ण आहेत असे नाही, त्या सूचक आहेत. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सभोवतीच्या परिस्थितीनुसार त्या बदलू शकतील. नव नवे प्रयोग करणारा सर्जनशील शिक्षक या आणि यांसारख्या वेगळया, नवीन अध्ययन अध्यापन प्रक्रिया वापरून अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करू शकेल.

- “अध्ययन निष्पत्ती ही विधाने आहेत जी ज्ञान किंवा कौशल्य बद्दल माहिती देतात.” ते एखादया विशिष्ट वर्गात किंवा अभ्यासक्रमाच्या शेवटी विदयार्थ्यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययन वाढीसाठी वापरणे गरजेचे आहे.
- अध्ययन निष्पत्ती प्रक्रिया वर आधारित विधान आहे. ज्यात समग्र विकासाचे प्रमाण ठरविताना एखादया मुलाच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी गुणात्मक किंवा परिणामात्मक पद्धतीने मोजता येण्यासारखे पडताळणीचे मुद्दे पुरविलेले असतात.
- ‘पाठ्यक्रमाच्या अपेक्षा’ यात मुलाला कोणते ज्ञान मिळावे, त्याच्यात मुलभूत क्षमता निर्माण व्हाव्यात, प्राथमिक / माध्यमिक शिक्षणाच्या काळात त्याची मनोभूमिका कशा प्रकारे विकसित व्हायला हवी, हे सांगितलेले असते. पाठ्यक्रमाच्या अपेक्षा आणि अभ्यासक्रम यांच्या आधारे निश्चित केलेल्या अध्ययन निष्पतींचा उपयोग, अध्ययन प्रक्रियेशी संबंधित असलेल्या सर्वांनाच नेमके साध्य समजण्यासाठी उपयोगी ठरू शकतील. सामान्यपणे अध्ययन निष्पत्ती ह्या तपासणीसाठीच्या मानक (benchmarks) किंवा प्रमाणभूत (standard) असतात.

**इयत्ता 2 री च्या भाषा विषयाच्या अध्ययन निष्पत्ती व त्यानुरूप उपक्रम उदाहरणासाठी खाली दिलेले आहेत. ते अभ्यासून आपणास आपल्या विषय व वर्गांनुसार अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी विविध अध्ययन प्रक्रिया राबवावी.**

| **अध्ययन सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया** | **अध्ययन निष्पत्ती** | **शाळेने राबविलेले उपक्रम** |
|---|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळया रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>• आपल्या भाषेत बोलण्याचे, चर्चा करण्याचे भरपूर स्वातंत्र्य आणि संधी दिली जावी. | • अध्ययनार्थी विविध उद्देशांसाठी स्वत:ची भाषा किंवा/आणि शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. उदा. माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्वत:चे अनुभव सांगणे, अंदाज व्यक्त करणे.<br>• गप्पा, गोष्टी, कविता इत्यादी | • पटकथा आणि भूमिकाभिनयाच्या माध्यमातून विदयार्थ्यांना नवीन संकल्पना शिकवल्या जातात .<br>• विदयार्थ्यांना पाठ्यक्रमावर आधारित संकल्पनांवर रचना, अभिनय व नाटक |

<table>
<tr>
<td>• मराठीमध्ये ऐकलेली गोष्ट, कविता, कथा इत्यादी आपल्या पद्धतीने आणि आपल्या भाषेत सांगण्याची/प्रश्न विचारण्याची तसेच त्यात आपल्या विचारांची भर घालण्याची संधी दिली जावी.<br>• मुलांद्वारे त्यांच्या भाषेत बोलल्या जाणाऱ्या गोष्टी मराठी भाषा आणि इतर भाषांमध्ये (जी भाषा वर्गात वापरली जाते किंवा ज्या भाषांमध्ये मुले वर्गात बोलतात.) पुन्हा मांडण्याची संधी द्यावी. त्यामुळे त्या भाषांना वर्गात योग्य स्थान मिळू शकते आणि मुलांच्या शब्दसंपत्ती, अभिव्यक्तीच्या विकासास संधी मिळू शकेल.<br>• वाचनकट्ट्याद्वारे मुलांना स्तरांनुसार वेगवेगळया भाषांची (मुलांची स्वत:ची भाषा/इतर भाषेंतील) मनोरंजक साहित्य जसे- बालसाहित्य, बालपत्रिका, फलक, दृक्श्राव्य साहित्य उपलब्ध करून द्यावे.<br>• चित्रांच्या आधारे अनुमान लावून वेगवेगळया कथा, कविता अभ्यासण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.</td>
<td>लक्षपूर्वक ऐकतात, स्वत:च्या भाषेत सांगतात.<br>• पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इत्यादीं बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.<br>• आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या गोष्टींशी संबंध जोडून त्याबाबत गप्पागोष्टी करतात. उदा. कथा, कविता, पोस्टर्स, जाहिरात इत्यादी.<br>• शब्द आणि ध्वनींच्या उच्चारांची मजा घेत लय आणि ताल असणारे शब्द तयार करतात. उदा. एक होता कावळा, जरासा बावळा.<br>• स्वत:च्या कल्पनेने कथा, कविता इत्यादी ऐकवतात व त्यात भर घालतात.<br>• आपला स्तर व आवडीनुसार कथा, कविता, चित्र, पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी अभिप्राय देतात, प्रश्न विचारतात.<br>• चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.<br>• चित्रातील वा चित्रमालिकांतील घडणाऱ्या घटना, कृती आणि पात्र इत्यादी एकसंघपणे समजून त्याचा आनंद घेतात.</td>
<td>करण्यास सांगितले जाते.<br>• विद्यार्थ्यांना 2-3 शब्द दिले जातात. त्यातून त्यांना एक नवीन कथा तयार करण्यास सांगतात. विद्यार्थ्यांचे त्यांच्या वयानुसार गट केले जातात आणि त्यांना साध्या शब्दात यमक जुळणाऱ्या कविता लिहिण्यासप्रोत्साहित केले जाते.<br>• विदयार्थ्यांना एक शब्द दिला जातो आणि त्या शब्दांशी संबंधित शब्दांबद्दल विचार करायला सांगतात व लिहायला सांगतात, त्यामुळे त्यांच्या शब्दसंग्रहात वाढ होते.<br>• एका कृतीत विदयार्थ्यांना मराठी अक्षर दिली जातात आणि त्या पासून नवीन शब्द तयार करण्याची प्रोत्साहित करणे देखील समाविष्ट आहे.<br>• चित्राचे निरीक्षण व वाचन करून त्याविषयी माहिती सांगणे, लिहिणे,अंदाज व्यक्त करणे अशा कृती घेतल्या जातात.</td>
</tr>
<tr>
<td colspan="3">या प्रमाणे इयत्ता 1 ते 12 पर्यंत सर्वच विषयासाठी अध्ययन निष्पत्ती निश्चित केलेल्या असून त्या SCERT, पुणे व NCERT या संस्थांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.त्या अधिक माहितीसाठी अभ्यासाव्यात.</td>
</tr>
</table>

अध्ययन निष्पत्ती या वर्गनिहाय, विषय निहाय असून त्यांचा विद्यार्थ्यांच्या अंगाने एकत्रितपणे विचार करावयाचा आहे. तुकड्या-तुकड्यात नाही. त्याचप्रमाणे अभ्यासक्रमात परिभाषित केलेल्या अध्ययन निष्पत्ती या क्षेत्र, स्तरानुसार समग्र स्वरूपात लक्षात घ्यावयाच्या आहेत. शाळा प्रमुख हे या संबंधीच्या सविस्तर माहितीसाठी अध्ययन निष्पत्ती संबंधीचा घटक संच अभ्यासण्यासाठी एनसीईआरटीच्या वेबसाईटला भेट देऊ शकतात. अध्ययन प्रक्रियेत सर्व गटातील मुलांचा सहभाग सुनिश्चित करणे आणि इतर मुलांप्रमाणे CWSN मुलांना  प्रगती करण्यास मदत करणे, या मुलांची इतर मुलांशी तुलना करणे टाळणे. मुलांच्या वैयक्तिक गरजांप्रमाणे अध्ययनाच्या गरजेप्रमाणे आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम आणि शैक्षणिक वातावरणात सुधारणा करणे आवश्यक असते.

**A) अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शैक्षणिक अध्ययन अध्यापन प्रक्रिया -**

विषय ज्ञानाच्या संकल्पनेची आकलन तपासणी करण्यासाठी वाव , प्रत्येक संकल्पनेच्या परिपूर्तीसाठी आवश्यक त्या घटकातील भागास पुनर्भेट संधी, अवगत असलेल्या ज्ञान व कौशल्याबाबतच्या चुकीच्या संकल्पनाबाबत आव्हानाला आव्हान देण्यास पुरेशी संधी, कृतिशील सहभाग द्वारे तसेच अध्ययनार्थी केंद्रित, कृती केंद्रित, सहभागी अध्ययन अनुभव, नाटिका, प्रकल्प, चर्चा, संवाद, परिसंवाद, निरीक्षण, भेटी, समग्र उत्पादनक्षम कामासह, शैक्षणिक अध्ययन, शांततेच्या मूल्याला प्रोत्साहित केले जाते. लोकशाही पद्धतीचे जीवन, समता आणि समानता, न्याय, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक पुनर्रचना संबंधीची कृतीयुक्त ओढ इत्यादी बाबींचा समावेश सक्रीय, सहभागी व कृतीशील अध्ययन अध्यापन प्रक्रियेत होतो. अशी विविधांगी अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा समावेश दुर्गम व आदिवासी भागात आवश्यक आहे.

**B) अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शैक्षणिक पर्यवेक्षण प्रक्रिया -**

शैक्षणिक नेतृत्व करण्याची भूमिका ही अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या पर्यवेक्षणाची आहे. जी व्यक्तिशः आणि एकत्रितपणे शिक्षकांच्या कौशल्यवृद्धीकरिता उत्तेजन, समन्वय आणि मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न या बाबींचा समावेश असलेली आहे. शैक्षणिक पर्यवेक्षक  म्हणून शाळा प्रमुख शिक्षकांकरिता त्यांचे ध्येय स्पष्टपणे ठरवू शकतो आणि ती साध्य करण्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करून देऊ शकतो. विषयानुसार त्यातील प्रत्येक घटकांशी  शिक्षकांच्या आणि विदयार्थ्यांच्या पार्श्वभूमीतील विविधता तसेच मुलांच्या अध्ययनातील विभिन्न गरजा इत्यादी बाबत सखोल मार्गदर्शन अंतर्भूत आहे.

### C) अध्ययन निष्पत्ती आणि मूल्यमापन -

आदिवासी व दुर्गम भागातील विदयार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेच्या दरम्यान स्वतःच्या कामाचे समीक्षण करणे, प्रतिक्रिया देणे आणि त्याचे विश्लेषण करणे आणि त्यांच्यातील समस्या आणि उणिवा ओळखणे याकरिता संधी आणि जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यांना स्वतःचे मूल्यमापन करण्यास आणि सहाध्यायींच्या आणि गटांच्या कार्यावर विचार करून प्रतिक्रिया देण्यास प्रोत्साहन व संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. असे मूल्यमापन हे मुलांचा आत्मविश्वास वाढवतात आणि आजीवन शिक्षणासाठी त्यांच्यात क्षमता विकसित करतात. अशी समग्र व आधारभूत मूल्यमापन प्रक्रिया निवडणे **नियोजित वर्गासाठी दिलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी विविध उपक्रमांचा समावेश करून शैक्षणिक वातावरणात सुधारणा करणे** आवश्यक आहे.

### विदर्भ प्रांतातील (महाराष्ट्र ) आदिवासी व दुर्गम भागातील शाळा व शालेय नेतृत्वापुढील आव्हाने -

- **आदिवासी व दुर्गम भागात** वेगवेगळया भाषा बोलल्या जातात ज्या प्रमाणित व शैक्षणिक माध्यम भाषेपेक्षा वेगळया असतात. यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे कठीण व अडचणीचे असते.
- **आदिवासी व दुर्गम** भागांमध्ये रस्ते तसेच इतर नागरी सुविधांचा अभाव आपणास दिसून येतो.
- **आदिवासी व दुर्गम** भागांमध्ये आदिवासी समाजांची भाषा ही वेगळी आहे. एकच असलेली शिक्षण प्रक्रिया ही त्यांना अवगत करण्यासाठी खूपच कठीण जाते .
- **आदिवासी व दुर्गम** भागांमध्ये आजही अशिक्षित असण्याचे प्रमाण आपणास जास्त दिसून येईल. शिक्षणाविषयी अनास्था आपणास दिसून येते.
- जुन्या परंपरा, रूढी यांचा अधिक पगडा **आदिवासी व दुर्गम** भागांमध्ये असतो त्यामुळे मुलींना शाळेत येण्यात अडचणी येतात.

### आदिवासी व दुर्गम भागातील यशस्वी नेतृत्वाचा अभ्यास –

शालेय नेतृत्वाला आदिवासी व दुर्गम भागात काम करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करत अध्ययन निष्पत्तीनुसार काही मुख्याध्यापक व शिक्षक आपली शाळा सतत प्रगतीशील व उपक्रमशील ठेवून, इयत्ता व विषयनिहाय निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य करून गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट गाठतात. अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शैक्षणिक प्रक्रिया कशी असली पाहिजे तसेच यासाठी शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम निष्पत्ती साध्यतेसाठी राबविले गेले पाहिजेत हे आपण **इयत्ता 2 री च्या भाषेचा वरील प्रमाणे तक्ता पाहिल्यास लक्षात येईल.** अशाच एका शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत ज्यांनी शिक्षकांच्या मदतीने अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी विविध उपक्रम निश्चित केले. या उपक्रमांची अंमलबजावणी यशस्वीपणे शाळेत करून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक विकास साधत अध्ययन निष्पत्ती आधारे शैक्षणिक वातावरण उत्तम करण्याचा यथोचित प्रयत्न केला. या शाळेची यशोगाथा खालील प्रमाणे,

## यशोगाथा

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,चारबन,

## ता.जळगाव जामोद, जि.बुलडाणा.

**1) गोवर्धन दांडगे,(मुख्याध्यापक ) 2) दीपक उमाळे (कृतीशील शिक्षक)**

**प्रस्तावना –**

ही महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतातील बुलडाणा जिल्ह्यात अतिशय दुर्गम भागांमध्ये वसलेली व शंभर टक्के आदिवासी वस्ती असलेली शाळा आहे. आताच्या कोविड काळातही अतिशय सातत्त्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण कार्य शालेय नेतृत्वाने सहकार्यांच्या मदतीने सुरु ठेवले. त्यासाठी त्यांना विभागस्तरावर उत्कृष्ट कार्यासाठी गौरविण्यात आले आहे. पालकांनी विद्यार्थ्यांशी असलेला त्यांच्याच आदिवासी भाषेतून संपर्क हे या शाळेचे वैशिष्ट्य असून शिक्षकांनी सदर भाषाही अवगत केली आहे त्यामुळे शाळेविषयी विद्यार्थी आणि पालक तसेच इतर सर्व गावकरी यांच्यामध्ये आपुलकीची भावना निर्माण झालेली आहे.

**शाळेतील भौतिक सुविधा**











**शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया**

परंपरागत पाठांतर पद्धतीचा वापर न करता शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी वर्गात नावीन्यपूर्ण वेगवेगळया अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अवलंब केला, परंतु हे त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठिंब्याशिवाय शक्य नव्हते. त्यांच्या सर्व शिक्षकांनी महाराष्ट्रातील व जिल्हयातील अनेक प्रगतीशील शाळांना भेटी दिल्या. या भेटीचा एक परिणाम म्हणजे, तेथील शिक्षक सहकाऱ्यांकडून कृतीयुक्त अध्ययन-अध्यापन पद्धती संदर्भात झालेली ओळख, कृतीयुक्त अध्ययनाचे हे तंत्र शैक्षणिकदृष्ट्या चांगले निकाल देण्यास विदयार्थ्यांना प्रोत्साहित करण्यास अत्यंत उपयोगी ठरले आणि त्यांच्या ज्ञान ग्रहण करण्यात सुधारणा झाली. हे तंत्र समजल्यानंतर मुख्याध्यापकांनी त्यांच्या सहकार्यांसोबत बैठक घेऊन या तंत्राची संकल्पना सर्वांना समजावून सांगितली. महत्वाचे म्हणजे सर्व शिक्षकांनी या कामात उत्साह दाखवला आणि शाळेत बदल घडवला आणि कृतियुक्त अध्यापन तंत्र स्वीकारले. त्यांनी रचनावादी वर्ग रचनेच्या अनुषंगाने फरशी, भिंती रंगवण्यात मदत केली. शाळेत अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

- पटकथा आणि भूमिकाभिनयाच्या माध्यमातून विदयार्थ्यांना नवीन संकल्पना शिकवल्या जातात. विदयार्थ्यांना पाठ्यक्रमावर आधारित संकल्पनांवर रचना, अभिनय व नाटक करण्यास सांगितले जाते.

- विद्यार्थ्यांना तीन शब्द दिले जातात. त्यातून त्यांना एक नवीन कथा तयार करण्यास सांगतात. यामुळे विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार करण्याची आणि स्वतःची अभिव्यक्ती करण्यास ही कृती सक्षम बनविते आणि विदयार्थ्यांचे चिकित्सक विचार कौशल्य विकसित करते.
- विद्यार्थ्यांचे त्यांच्या वयानुसार गट केले जातात आणि त्यांना साध्या शब्दात यमक जुळणाऱ्या कविता लिहिण्यास प्रोत्साहित केले जाते.
- विदयार्थ्यांना एक शब्द दिला जातो आणि त्या शब्दांशी संबंधित शब्दांबद्दल विचार करायला सांगतात व लिहायला सांगतात, त्यामुळे त्यांच्या शब्दसंग्रहात वाढ होते.
- एका कृतीत विदयार्थ्यांना मराठी अक्षर दिली जातात आणि त्या पासून नवीन शब्द तयार करण्याची प्रोत्साहित करणेदेखील समाविष्ट आहे. त्यांच्या शब्द संपत्तीत वाढ करण्याचा हा देखील एक प्रयोग आहे.
- गणिती तर्क करण्याची क्षमता वाढवणे-व त्यावर आधारित उपक्रम
- विदयार्थ्यांच्या इंग्रजीत सुधारणा करण्यासाठी त्यांना इंग्रजी भाषेमध्ये -इंग्लिश डे, word builder, Vocabulary Enriching activities ,वाक्य रचना कृती,Picture reading activity, नाटक, कविता सादर करणे असे अनेक उपक्रम करण्यास प्रोत्साहित केले जाते.
- विदयार्थ्यांना त्यांची कलात्मक क्षमता सादर करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यांचे कलाकौशल्य दर्शवणारे प्रदर्शन आयोजित जाते. दैनंदिन परिपाठात संधी उपलब्ध करून दिली जाते .
- अध्ययन अध्यापन साहित्य कृतीखोली व वर्गखोली यांचा पुरेपूर उपयोग सर्वच वर्गांच्या व विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी केला जातो.
- शाळेत खेळाचे मैदान देखील आहे. हे मैदान शाळाप्रमुखांच्या पुढाकाराने तयार करण्यात आले आहे. त्यांनी नजीकच्या काळात शाळेत ग्रीनहाऊस बनवण्याची योजना आखली असून त्यामुळे विदयार्थ्यांना आरोग्यदायी आणि सकस आहार मिळू शकेल.
- विदयार्थ्यांना पौष्टिक आहार देणारे एक कार्यक्षम आणि सुसज्ज स्वयंपाकघर आहे. एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, शाळा फक्त विदयार्थ्यांचा ज्ञानात्मक स्तर फक्त उंचावण्याचा प्रयत्न करीत नाही, तर त्यांना सुयोग्य पौष्टिक आहार देखील पुरवते.
- अनेक अडचणींवर मात करत शाळा त्यांच्या विदयार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देण्यात यशस्वी झाली आहे.याचे कारण शिक्षक विदयार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करतात.







लोकमत

# चारबनच्या विद्यार्थ्यांनी साधला परदेशी ॲनिमेटरसोबत संवाद

## अभ्यास, खेळ, व्यवसाय शिक्षण या विषयांवर चर्चा

Hello Khamgaon
Page No. 2 Feb 21, 2022
Powered by: erelego.com



**शाळेत राबविले जाणारे विविध नाविन्यपूर्ण अध्ययन सुलभ उपक्रम -**

आदिवासी भाषा अवगत करून त्याचा शब्दकोश तयार केला .अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील नवनवीन प्रयोग आणि उपक्रम हे केवळ ज्ञानात्मक वाढीसाठी विदयार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षकांना देखील सक्षम बनवितात. विद्यार्थ्यांना आता कठीण संकल्पना समजणे सोपे झाले आहे.













**विदेशातील शिक्षण क्षेत्रातील संशोधकांनी दिलेली शाळाभेट :-**



**शाळेला प्राप्त पुरस्कार व सत्कार -**

मुलांना प्रेरित करण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत पालकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला. शाळेला जिल्हा परिषद शिक्षण समिती व शिक्षणाधिकारी यांनी या कार्याबद्दल गौरविले आहे. शाळेत मुख्याध्यापकांनी घडवून आणलेल्या बदलाबद्दल डायटच्या अधिकाऱ्यांनी शाळेचे कौतुक केले.






**समाज सहभाग व निधी संकलन -**

शाळा प्रमुख शाळेतील भौतिक सुविधांसोबतच शाळा व्यवस्थापन सक्षम करण्याचे कार्य करीत आहेत.आदिवासी भागात जनजागृती करून उल्लेखनीय समाज सहभाग त्यांनी मिळवला आहे.त्यामुळे मुख्याध्यापकांचा गौरव करण्यात आला आहे.



**समाज सहभागासाठी व शैक्षणिक गुणवत्तेसाठी आयोजित पालक ग्रामस्थ सभेत मार्गदर्शन करतांना कृतीशील शिक्षक श्री.दीपक उमाळे .**

**चिंतनात्मक प्रश्न -**

1) दुर्गम व आदिवासी भागातील मुलांना सुरक्षित वाटेल असे शिक्षणाचे वातावरण तयार करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत. किमान 5 मुद्दे लिहा ?
2) 'अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी कृती आधारित उपक्रम उपयुक्त आहेत यावर आपले मत स्पष्ट करा ?

प्रत्येक शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक/प्राचार्य यांची बलस्थाने आणि क्षमता वेगवेगळया असतात. ते या क्षमतांचा वापर वर्गव्यवस्था, सर्वसाधारण समस्या आणि दररोज येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी करतात, तथापि वर्गाचा आकार, संशोधनाचे स्वरूप, शिक्षकांचे प्रशिक्षण, क्षेत्रातील संसाधनांची उपलब्धता, भाषा आणि भौगोलिक विविधता इत्यादी समुदाय आणि शैक्षणिक प्रशासकांना शिकवण्याआधी आव्हान देण्यास प्रवृत्त करतात. प्रत्येक शिक्षक व मुख्याध्यापकांना शैक्षणिक नेतृत्व प्रदान करणे, नावीन्यपूर्ण अनुभव, दैनंदिन समस्या निराकरण करणे आणि शेवटी शाळेच्या उन्नतीसाठी योगदान देणे हे सुनिश्चित करणे आणि सक्षम करणे ही काळाची गरज आहे. वरील पार्श्वभूमीवर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) अध्ययन अध्यापनाचे वातावरण वृद्धिंगत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. सभोवतालच्या वातावरणाला अनुसरून आणि उपलब्ध परिस्थिती मध्ये ,साधनांचा सुयोग्य वापर आणि समाजाशी जवळीक साधून शाळेच्या भौतिक व शैक्षणीक विकासासाठी शाळेचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

- शालेय नेतृत्वाचा ठामपणे विश्वास असावा की, प्रत्येक मूल शिकण्यासाठी, प्रगत करण्यासाठी सक्षम आहे आणि त्यांचे शिक्षक अध्यापन पद्धती, प्रक्रिया, ज्ञान आणि कौशल्य यात सुधारणा घडवून आणू शकतात. त्यासाठी शिक्षकांनी व्यावसायिक विकास व नाविन्यता याचा स्वीकार करावा.
- वेगवेगळे घटक व क्षेत्रानुसार अध्ययन कृतीची तरतूद करावी .
- विदयार्थ्यांचे शिकणे आनंददायी व उत्साही करावे.
- विद्यार्थ्यांचे वयोगटानुसार व अध्ययन स्तरानुसार शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावी.
- माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) व्हिडिओ आणि डिजिटल स्वरूपातील उपलब्ध करावे.
- मोबिलिटी साधने (व्हीलचेअर, क्लचेस, पांढरी छडी) श्रवणयंत्र, ऑप्टीकल किंवा नॉनऑप्टीकल साधने, शैक्षणिक साधने (टेलर फ्रेम, अबॅकस इत्यादी) दिव्यांगासाठी उपलब्ध करून शिक्षण प्रक्रियेत समाविष्ठ करून घ्यावे .
- मूल्यमापन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांच्या सुधारणेकडे लक्ष द्यावे.
- विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन आणि चिकित्सक विचाराच्या आधारे मुद्दे शोधण्यास आणि त्याबाबत स्पष्टीकरण देण्यास प्रोत्साहन द्यावे.

- विदयार्थ्यांना संघात काम करण्यास, एकमेकास सहकार्य व सराव यावर स्वतंत्रपणे काम करण्यासाठी सर्वांना संधी द्यावी यातून सर्जनशीलता विकसित होईल .

**आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजना-**

आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे चार अपर आयुक्त व २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असून त्यांच्या मार्फत मागासवर्गीय कल्याणाच्या राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते.त्या खालीलप्रमाणे.

**१.शिक्षण हमी सुविधा.**

२६ ऑक्टोबर २०१८ च्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई परिपत्रकाअन्वये **आदिवासी व दुर्गम** क्षेत्रातील स्थलांतरित विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड उपलब्ध करून दिले जाते,ज्यामुळे आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राहतो.

**2.आदिवासी कल्याणाच्या विविध योजना.**

आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाने राज्य स्तरावर आदिवासी विभाग निर्माण केला असून शासन स्तरावरून आदिवासी कल्याणाच्या विविध योजना अंमलबजावणी केली जाते.

**3.आदिवासी वसतिगृह**

वसतिगृह ,शाळा ,शिक्षक यांची सोय केलेली आहे. **आदिवासी व दुर्गम** क्षेत्रातील स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत गाव पातळीवर हंगामी वसतिगृह योजनेअंतर्गत सोय करण्यात येते.

**4.आश्रम शाळा.**

शासनाने सर्व आदिवासी भागात **आदिवासी व दुर्गम** क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आश्रम शाळांची निर्मिती केली आहे.

**5. विविध शिष्यवृत्ती तसेच अध्ययन सामुग्री.**

सर्व आदिवासी भागात **आदिवासी व दुर्गम** क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आश्रम शाळांची निर्मिती केली आहे. त्यांची व्यवस्था शासन करते.तसेच विविध स्तरावर उपस्थिती भत्त्यापासून तर विदेशात शिक्षण घेण्यासाठी विविध शिष्यवृत्ती शासनाने घोषित केल्या आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा आढावा घेतला असता, आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शालेय शिक्षणाच्या महत्वाच्या उद्दिष्टांवर भाष्य केले आहे.**

1.सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे - सन 2030 पर्यंत 3-18 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणास प्रवेश मिळवून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग घेणे.

• सन 2030 पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून शालेयपूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत 100 % पटनोंदणी करावयाची आहे.

• शाळेतील मुलांच्या भरतीच्या संख्येत वाढ करणे, ज्या ठिकाणी शालेय सेवा आजवर देता आलेली नाही किंवा कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा ठिकाणी नवीन सुविधा विकसित करणे, आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी विशेषतः मुलींसाठी, संपूर्ण सुरक्षेची हमी देऊन शाळेत ये-जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकेनुसार उपलब्ध करुन देणे, अशा उपाययोजनांमधून शालेय प्रवेशाची दरी कमी करण्याचा मानस आहे.

• शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययनाच्या निष्पत्तीचा आढावा घेणे, तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवक यांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांच्या संख्येवर पाळत ठेवणे आणि शाळेबाहेरील पौगंडावस्थेतील मुलांसाठी कार्यक्रम राबवून मुलांचा शालेय शिक्षणातील सहभाग व अध्ययन वाढविले जाईल. औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक माध्यमांमधून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करुन दिले जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण (ओपन स्कूलिंग) व दूरवरुन शालेय शिक्षण (डिस्टन्स स्कूलिंग) व तंत्रज्ञान वापरण्याची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.

• जर आरोग्यविषयक कारणास्तव विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी त्वरित शाळेत रुजू होण्यास आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यात येतील. त्यामध्ये शाळेत आरोग्यसेवकांची नेमणूक करणे, तसेच याविषयी मोठ्या प्रमाणावर समाजामध्ये जनजागृती करणे

2.शालेय शिक्षणातील सर्व स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना व्यासंगी, उत्स्फूर्त, उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित शिक्षकांकडून शिकविले जाईल, याची दक्षता घेणे -

• सर्व शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती सर्वसमावेशक शिक्षक आवश्यकता नियोजन यावर आधारित कडक व नियमबध्द प्रक्रियेतून केली जाईल.

• अशा निवडीदरम्यान उमेदवारांमध्ये वैविध्य राखण्यासोबत स्थानिक शिक्षकांना व स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

• शिक्षकांच्या कार्याचे सुलभीकरण होण्यास्तव अपेक्षित विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तरासोबतच पुरेशा पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) व अध्ययन साहित्य पुरविले जाईल. सर्व विद्यार्थी योग्य अध्ययन करीत आहेत की नाही याबाबत शिक्षकांना खातरजमा करता यावी म्हणून सर्व स्तरांवर दोषनिवारक कार्यक्रम (रिमेडिअल प्रोग्रॅम्स) निर्माण करण्यात येतील.

3.सर्व मुलांना अध्ययनाच्या व उत्कर्षाच्या समान संधी मिळाव्यात आणि सन 2030 पर्यंत सर्व लिंगाच्या व सामाजिक वर्गवारीच्या सहभागामध्ये व अध्ययनाच्या निष्पत्तीमध्ये समानता असावी या उद्देशाने एक सर्व समावेशक व न्याय शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे.

• कमी प्रतिनिधित्व असणाऱ्या गटांमधील किंवा वंचित मुलांच्या बाबतीत प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण, पायाभूत साक्षरता व अंकज्ञान, शालेय उपलब्धता, शालेय प्रवेश व उपस्थिती यांच्याशी निगडित असलेल्या धोरणातील कृतीकडे विशेष लक्ष व साहाय्य  पुरविले जाईल. देशभरातून वंचित प्रदेशांमध्ये विशेष शिक्षण झोन्स उभारण्यात येतील. त्यासाठी केंद्र शासन आर्थिक साहाय्य करेल.

• वंचित गटांमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, साधने व सुविधा विकसित केल्या जातील.

नॅशनल एज्युकेशन पॉलिसी' (NEP2020 ) मध्ये  आदिवासी व दुर्गम भागातील शिक्षण .

**नॅशनल एज्युकेशन पॉलिसी' (NEP2020 ) मध्ये  आदिवासी व दुर्गम भागातील शिक्षण यामध्ये स्पष्ट नमूद आहे की ,मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्या असलेल्या अनेक राज्यांमध्ये प्राथमिक वर्गांसाठी मातृभाषेवर आधारित बहुभाषिक शिक्षण कार्यक्रम आहेत. परंतु अजूनही एक दरी अस्तित्वात आहे कारण आदिवासी भाषा शिक्षकांची उपलब्धता, प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम विकास या बाबी हाताळल्या गेल्या नाहीत. जागतिक बँकेच्या मूल्यांकनानुसार, किमान 55% भारतीय मुलांना वाचनात अडचणी आहेत . भारताने आपल्या आदिवासी भागात  शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. यावर जोर देण्याची गरज आहे.NEP 2020 ने बालपणीच्या शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे तसेच  केंद्र आणि राज्य दोघांनीही सार्वजनिक गुंतवणुकीच्या पाठींब्याने  मजबूत हेतूने अभ्यासक्रम तयार केला पाहिजे.यावर NEP 2020 जास्त लक्ष केंद्रित करते व मातृभाषेत शिक्षण मिळावे अशी व्यवस्था करण्याची गरज असल्याचे दर्शविते.**

**आदिवासी व दुर्गम भागातील शाळांमध्ये नेतृत्वाची भूमिका" या मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता –**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दि.22 जून, 2015 शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई या कार्यक्रमांर्गत महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात अत्यंत महत्वपूर्ण विषयांवर काम करण्यात आले ज्यात, शाळाबाह्य विद्यार्थी शाळेत आणणे, वयानुरुप प्रवेश, बालरक्षक चळवळ यातून आदिवासी व दुर्गम भागातील

शाळांमध्ये शिक्षणात येणाऱ्या अडथळयांवर मात करण्यासाठी राज्य स्तरावरुन समता व आदिवासी शिक्षण विभागाअंतर्गत शिक्षण विभागातील अधिकारी ते शिक्षक सर्वांना प्रशिक्षित करण्यात आले, या सर्व अभ्यासातूनच मोड्यूलची निर्मिती झाली ज्याचा नक्कीच फायदा शैक्षणिक नेतृत्व विकासाच्या वाटचालीत होईल.

- शिक्षण हक्क कायदा 2009 ची यशस्वी अंमलबजावणी
- प्रत्येक विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क बाधित होऊ न देता यशस्वी शिक्षण प्रक्रिया
- आदिवासी व दुर्गम भागातील शाळांमध्ये येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण, वर्गीकरण, विश्लेषण, करुन समस्येची सोडवूणक
- Get Outside of your comfort zone - यानुसार काम करण्याची प्रेरणा
- बहुकार्यप्रवणतेत वाढ, कमी वेळात अधिकाधिक काम करण्याची क्षमता
- संघभावनेत वाढ, त्यातूनच समस्या निराकरण होण्यास मदत

एकूणच प्रत्येक शाळेत मूल टिकेल व शिकेल आणि त्यातूनच गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रक्रियेची अंमलबजावणी होईल.

**NEP-2020 च्या अनुषंगाने मोड्यूल संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षण –**

आदिवासी व दुर्गम भागातील शाळांमध्ये उपेक्षित, वंचित विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे, ज्याद्वारे समाजात समानता, समावेशकता आणि सामाजिक, आर्थिक गतिशीलता मिळू शकते. अशा गटांतील सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन प्रगती करतील. या दृष्टीने NEP-2020 च्या भाग 1 शालेय शिक्षण यात करण्यात आला आहे.

- बाल्यावस्थापूर्व निगा आणि शिक्षण - शिकण्याचा पाया
- पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अध्ययनाची एक आवश्यक पूर्वअट
- गळतीचे प्रमाण कमी करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण
- अभ्यासक्रम आणि शाळांमधील बालअध्यापनशास्त्र यांचे 5+3+3+4 या आकृतीबंधात पुनर्गठन
- शिक्षकांची नियुक्ती, संस्कृती, व्यावयायिक विकास प्रगती
- समन्यायी समावेशीत शिक्षण
- शाळा समूह या माध्यमातून कुशल संसाधन आणि प्रभावी प्रशासन
- शाळा शिक्षणासाठी मानक निर्धारण आणि मूल्यांकन

अशाप्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक बालकास प्राप्त व्हावे यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये वरील मुद्यांवरून विचार करण्यात आला, ज्यातून विद्यार्थी व शिक्षण यंत्रणा निश्चितच अधिक सक्षम होईल.

**समारोप-**

शालेय शिक्षणात काम करताना परिस्थिती कितीही विपरीत व प्रतिकूल असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडे असते.विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून,शिकण्याची गोडी लावण्यासाठी शालेय नेता स्वतःचे शालेय नेतृत्व विकसित करतो. त्यात स्वयं विकास संघ बांधणी, भागीदारी,शालेय प्रशासन या भूमिका व जबाबदाऱ्या समर्थपणे पेलतो. अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून अपेक्षित परिणाम साधण्यासाठी प्रोत्साहन देतो. अध्ययन निष्पत्ती साध्यतेसाठी विविध उपक्रम ,भौतिक सुविधा यांची उपलब्धता यावर काम करतो आणि आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या माध्यमातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो. मुख्याध्यापक व शिक्षक कार्यरत आहेत ज्यांच्या कार्याच्या अभ्यासातून, आदिवासी व दुर्गम क्षेत्रातील बालकांच्या शिक्षणासाठी यशस्वी कार्य सतत व्हावे ,यासाठी सर्वांना शुभेच्छा.

**संदर्भ साहित्य -**

**१. प्राथमिक ,उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अध्ययन निष्पत्ती ,हस्तपुस्तिका ,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

2.शासन निर्णय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र .२२ जून २०१५,१६ सप्टेंबर २०१६, ९ जानेवारी २०१७.

3. वयानुरूप शिक्षण प्रवेश, शिक्षण हक्क कायदा २००९

4. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८ संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे.

5. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

6.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०.

7.Subitha. GV and Charu Smila Malik. (eds). 2016. Resource Book on One Month Certificate Course on School Leadership and Management, NUEPA, New Delhi.

**अधिक अभ्यासासाठी व पूरक लिंक व वेबसाइट पत्ता**

1) http://ebalbharati.in/main/publicHome.aspx
2) https://ncert.nic.in/
3) http://www.maa.ac.in/index.php?tcf=library_sectionv
4) www.swayam.gov.in
5) https://www.swayamprabha.gov.in/
6) https://diksha.gov.in.
7) http://ncsl.niepa.ac.in/

8) http://pslm.niepa.ac.in/
9) https://itpd.ncert.gov.in/

**Web Resources:-**


- Learning outcomes. http://www.ncert.nic.in/pdf/Annual_report_17_18.pdf
- National Curriculum Framework for Teacher Education Towards Preparing Professional and Humane Teacher. NCFTE 2009. http://nete-india.org/nete_new/pd/NCFTE_2010.pdf
- TESS-India. Transforming teaching-learnin
- g process: Leading teacher's professional development. https://www.openedu/openlearncreate/course/view.php?id=1911
- https://tribal.maharashtra.gov.in/
- http://www.ncsl.niepa.ac.in



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री.ओमप्रकाश शेळके | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| विषय सहायक | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था बुलडाणा | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |